ePaper
वर्ष - 8 । अंक - 257 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
www.mahaenews.com | बुधवार, दि. 9 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## बाबा सिद्दीकी हत्याप्रकरणी मोठं यश, मोस्ट वॉन्टेड आरोपीला अटक



### आतील पानांत


- लखनौचा अखेरच्या चेंडूवर विजय
- रोहित शर्माच्या नावाचं स्टँड होणार?
- डोनाल्ड ट्रम्प यांचा चीनला धक्का!
- वक्फविरोधाला हिंसक वळण


## मराठीचा आग्रह कशासाठी? : राज ठाकरे यांची भूमिका चुकीची !

# राहुल गांधी भाजपाचे, ब्रँड अँबेसिडर

## 2029 मध्ये भाजपाप्रणित 'एनडीए' आघाडीच सत्तेवर : सुधारित 'वक्फ बोर्ड' मुळे मुस्लिमांचे कल्याणच!



। जळगांव / मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**पुढील लोकसभा निवडणुकीत म्हणजेच २०२९ मध्ये आदरणीय नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारच सत्तेवर येईल. जोपर्यंत राहुल गांधी हे काँग्रेसचे नेते आहेत, तोपर्यंत भाजपा यशस्वीच होणार. थोडक्यात, राहुल गांधी हे भाजपाचे 'ब्रँड अँबेसिडर' आहेत, असे वक्तव्य केंद्रीयमंत्री रामदास आठवले यांनी केले. ते जळगाव येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.**

### डॉ. आंबेडकर पंतप्रधान झाले असते..!

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अजून काही दिवस जगले असते, तर ते निश्चितपणे देशाचे पंतप्रधान झाले असते. संविधान तयार करण्यात सर्वांचेच योगदान होते. मात्र, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी स्वतः म्हटले आहे, की डॉक्टर आंबेडकर हे संविधानाचे शिल्पकार आहेत. डॉ.आंबेडकर यांची अफाट बुद्धिमत्ता आणि त्यांचा दृष्टिकोन यामुळे त्याचा फायदा त्यांनी देशाच्या राजकारणाला आणखी करून दिला असता..फक्त ते पंतप्रधान होणे आवश्यक होते !

### 'वक्फ बोर्ड' मुस्लिमांच्या हिताचा !

मोदी सरकारने वक्फ विधेयकात केलेले बदल हे मुस्लिमविरोधी नाहीत, तर मुस्लिमांना सधन आणि सक्षम करण्यासाठी आहेत. मात्र, विरोधकांकडून सातत्याने या संदर्भात मुस्लिम समाजात गैरसमज निर्माण केले जात असून दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे काम सुरू आहे, असे आठवले म्हणाले.

### काश्मीरमधील बदल बघा तरी..

भारतीय जनता पार्टी ही मुस्लिमांच्या विरोधात मुळीच नाही. मोदी सरकारमुळे काश्मीर मधील ३७० वे कलम हटवले गेले आणि तेथील ९९ टक्के दहशतवादी हल्ले कमी झाले. काँग्रेस सत्तेवर असती, तर काश्मीरमध्ये शांतता आली नसती आणि तेथील विकासही झाला नसता, असा हल्लाबोल त्यांनी केला.

### दादागिरी करणे चुकीचेच..

महाराष्ट्रात संपूर्ण देशातील नागरिक सामावले आहेत, मुंबई ही तर देशाची आर्थिक राजधानी आहे, त्यामुळे मराठीसाठी आग्रह धरणे आणि दादागिरी करणे, ही मनसे प्रमुख राज ठाकरे यांची भूमिका पूर्णपणे चुकीची आहे, असा दावा आठवले यांनी केला.

### 'मनसे'ची मान्यता रद्द करू नका..

उत्तर भारतीय विकास सेनेकडून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची पक्ष मान्यता रद्द करावी, अशी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. हिंदी भाषकांवर मनसे कार्यकर्त्यांकडून हल्ले केले जात असल्याचा आरोप या याचिकेत करण्यात आला आहे. याबाबत आठवले म्हणाले, की या पक्षाची मान्यता रद्द करू नये. मात्र, आम्ही राज ठाकरे यांच्या भूमिकेशी पूर्णपणे असहमत आहोत. मुंबई ही आर्थिक राजधानी आहे आणि सर्वांना आर्थिकदृष्ट्या सावरण्याचे काम मुंबईने केले आहे.

### फडणवीस यांनी राज ठाकरेंच्या घरी जाऊ नये..

एका प्रश्नाला उत्तर देताना आठवले म्हणाले, की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरे यांच्या घरी जाऊ नये. मुख्यमंत्री झाल्यानंतर ते दोन-तीनदा जाऊन आले आहेत. मुंबईला बदनाम करून आर्थिक फटका देण्याचे काम सध्या सुरू आहे. त्याकडे फडणवीस यांनी लक्ष दिले पाहिजे आणि मनसे बरोबर विकासासंदर्भात बोलले पाहिजे.

### बँकांवर दादागिरी कशासाठी?

आठवले म्हणाले, की बँकांमध्ये मराठीचा आग्रह करणे चुकीचे आहे कारण तेथे अमराठी कर्मचारी असतात. राज ठाकरे यांना याबद्दल सद् सद् विवेकबुद्धी येवो, अशी अपेक्षा व्यक्त करून ते म्हणाले की राज ठाकरे यांनी अनावश्यक विषय समोर आणू नयेत. त्यांनी लोकसभेच्या वेळी आम्हाला पाठिंबा दिला होता. पण, त्याचा आम्हाला कसलाही फायदा झाला नाही.

### छत्रपतींच्या सैन्यात अनेक मुस्लिम !

एका प्रश्नावर बोलताना आठवले म्हणाले की औरंगजेबाच्या कबरीचा वाद हा 'छावा' चित्रपट आल्यानंतर सुरू झाला. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या सैन्यामध्ये मोठ्या प्रमाणावर मुस्लिम बांधव होते. सर्व धर्मांमध्ये बंधूभाव वाढवण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान आहे. हा वाद जास्त वाढू नये,असे माझे मत आहे.

### राहुल गांधी राजकारणात राहोत..

काँग्रेसचे नेतृत्व राहुल गांधी यांच्याकडेच राहू दे आणि तेच मुख्य प्रचारक असू देत, कारण राहुल गांधी ज्या ठिकाणी सभा घेतात, त्या ठिकाणी भारतीय जनता पक्ष प्रणित एनडीए चा उमेदवार विजयी होतो. राहुल गांधी हे तर आमचे 'ब्रँड ॲम्बेसिडर' आहेत, असा टोलाही आठवले यांनी लगावला.

# सर्वाधिक वीजग्राहक पुणे विभागात!

## 39 लाख ग्राहकांची नोंद; 2 वर्षांत 4 लाख नवीन वीजजोडण्या

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात महावितरणच्या पुणे विभागामध्ये वीजग्राहकांची सर्वाधिक नोंद झाली असून, ३९ लाख १७ हजार ७०१ ग्राहकांना वीजसेवा देण्यात आली आहे. वीजजोडणी देण्यामध्येही पुणे विभाग अग्रेसर राहिला असून, गेल्या दोन वर्षांत ४ लाख ३४ हजार इतक्या विक्रमी वीजजोडण्या दिल्या आहेत. नवीन वीजजोडणी, वीजबिलांचे अचूक बिलिंग, वीजहानीतील घट या उपाययोजनांमुळे वार्षिक महसुलात ५ हजार १३७ कोटी ५५ लाख रुपयांची विक्रमी वाढ झाली आहे.**




महावितरणचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी ही माहिती दिली. पुणे विभागात पुणे, बारामती आणि कोल्हापूर या उपविभागांचा समावेश आहे. रास्ता पेठेतील 'प्रकाशदूत' सभागृहामध्ये पुणे विभागाच्या वार्षिक आढावा बैठकीत पवार यांनी ग्राहकसेवेसह गेल्या तीन आर्थिक वर्षातील विविध कामांचा आढावा घेतला. या वेळी अधीक्षक अभियंता युवराज जरग, सिंहाजीराव गायकवाड, रवींद्र बुंदेले, संजीव नेहेते आणि अनिल घोगरे, सहायक महाव्यवस्थापक माधुरी राऊत, शीतल निकम आदी उपस्थित होते.पवार म्हणाले, 'गेल्या दोन वर्षात पुणे विभागामध्ये शंभर टक्के अचूक बिलिंगचे लक्ष्य ठेवण्यात आले. त्यानुसार करण्यात आलेल्या उपाययोजनांना गती देण्यात आली. वीजबिल वसुलीची कार्यक्षमता वाढल्याने घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांकडील १२४ कोटींची थकबाकी सन २०२४-२५ अखेर ६९ कोटींवर आली आहे. गेल्या दोन वर्षांत ६२ कोटी ४० लाख रुपयांची वीजचोरी उघडकीस आणण्यात आली. वीजहानी टाळण्यासाठी आणि अचूक बिलिंगसाठी केलेल्या उपाययोजनांमुळे वीज वितरणाच्या हानीमध्ये ०.३६ टक्के, लघुदाब वीजहानीत ०.९६ टक्के तसेच तांत्रिक व वाणिज्यिक हानीमध्ये ०.३२ टक्के घट झाली.

सध्या विभागाच्या तांत्रिक व वाणिज्यिक हानीचे प्रमाण ७.६९ टक्के आहे. त्यामुळे विभागाचा वार्षिक महसूल २१ हजार २८० कोटी रुपयांवर पोहोचला आहे.'प्रधानमंत्री सूर्यघर योजनेला गती देऊन छतावरील सौरऊर्जेच्या स्थापित क्षमतेत राज्यात सर्वाधिक १५ टक्के वाटा पुणे विभागाने उचलला आहे. दोन वर्षांपूर्वी ९ हजार ९७७ ग्राहकांकडे छतावरील सौर प्रकल्पांची क्षमता २४९ मेगावॅट होती. यंदा मार्चअखेर २८ हजार ६०४ ग्राहकांकडे ही क्षमता राज्यात सर्वाधिक ४७४ मेगावॅट झाली आहे, अशी माहिती राजेंद्र पवार यांनी दिली. दर्जेदार व तत्पर ग्राहकसेवा, महसूलवाढ आणि वीजबिलांची शून्य थकबाकी या त्रिसूत्रींच्या आधारे गेल्या दोन वर्षांत काम करण्यात आले. अभियंते, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने पुणे विभागाने चांगली कामगिरी केली आहे. या त्रिसूत्रीनुसार आगामी काळातही कामकाज केले जाणार आहे. महावितरणचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी ही माहिती दिली. पुणे विभागात पुणे, बारामती आणि कोल्हापूर या उपविभागांचा समावेश आहे. रास्ता पेठेतील 'प्रकाशदूत' सभागृहामध्ये पुणे विभागाच्या वार्षिक आढावा बैठकीत पवार यांनी ग्राहकसेवेसह गेल्या तीन आर्थिक वर्षातील विविध कामांचा आढावा घेतला. या वेळी अधीक्षक अभियंता युवराज जरग, सिंहाजीराव गायकवाड, रवींद्र बुंदेले, संजीव नेहेते आणि अनिल घोगरे, सहायक महाव्यवस्थापक माधुरी राऊत, शीतल निकम आदी उपस्थित होते.

### 62 कोटी 40 लाख रुपयांची वीजचोरी

वीजबिल वसुलीची कार्यक्षमता वाढल्याने घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांकडील १२४ कोटींची थकबाकी सन २०२४-२५ अखेर ६९ कोटींवर आली आहे. गेल्या दोन वर्षांत ६२ कोटी ४० लाख रुपयांची वीजचोरी उघडकीस आणण्यात आली.हानीमध्ये ०.३२ टक्के घट झाली. सध्या विभागाच्या तांत्रिक व वाणिज्यिक हानीचे प्रमाण ७.६९ टक्के आहे.

# पावसाळापूर्व कामांचे महापालिकेकडून नियोजन

## अतिरिक्त आयुक्तांकडून संबंधित विभागांना सूचना

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पावसाळा सुरू होण्यापूर्वी महापालिकेच्या सर्व विभागांमध्ये समन्वय राहावा, यासाठीचे नियोजन महापालिकेने सुरू केले आहे. शहरातील ९० किलोमीटर लांबीच्या नाल्यांची, १२५ पावसाळी वाहिन्यांची सफाई ७ जूनपूर्वी प्राधान्याने पूर्ण केली जाणार आहे. तसेच, समाविष्ट गावांमधील १२३ पाणी साचणारी ठिकाणे आणि नाल्यांवरील १८९ ठिकाणची अतिक्रमणेही संयुक्त कारवाईद्वारे काढून टाकण्याचे नियोजन महापालिकेने केले**




महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी ही माहिती दिली.कामे पूर्ण करण्यासाठी त्यांनी मंगळवारी आपत्ती व्यवस्थापनाची आढावा बैठक घेतली. या बैठकीला महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त एम. जे. प्रदीप चंद्रन, सांडपाणी व्यवस्थापन विभागाचे मुख्य अभियंता जगदीश खानोरे, अधीक्षक अभियंता दिनकर गोजारे, यांच्यासह आपत्ती व्यवस्थापन अधिकारी गणेश सोनुने, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), महामेट्रो, महावितरण, तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रतिनिधी उपस्थित होते.पावसाळा सुरू होण्यापूर्वी महापालिकेतील प्रत्येक विभागाने आवश्यक असलेली सर्व कामे पूर्ण करावीत, अशा सूचना या बैठकीत विभागप्रमुखांना करण्यात आल्या. विभागाच्या वतीने सुरू असलेली कामे दिलेल्या वेळेत पूर्ण होत आहेत, की नाही, याचा आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. पावसाळ्यात कोणत्याही भागात पाणी तुंबण्याचे प्रकार घडू नयेत, यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालयांसाठी नालेसफाई व ड्रेनेज सफाईसाठी प्रत्येकी एकेक, अशा ३० निविदा काढण्यात आल्या आहेत. त्यानुसार ही कामे केली जातील. समाविष्ट २३ गावांमध्ये पावसाळी वाहिन्या नसल्याने या गावांमधील नालेसफाईसाठी आठ निविदा काढण्यात आल्या आहेत. लांबीचे नाले व १२५ पावसाळी वाहिन्या प्राधान्यक्रमाने स्वच्छ केल्या जाणार असल्याचे पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले.

### 23 गावांमध्ये आवश्यक उपाययोजना

महापालिकेच्या वतीने केली जाणार असून, सर्व क्षेत्रीय अधिकारी व परिमंडळ अधिकाऱ्यांनी या कामांवर नियमित लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. 'पीएमआरडीए'च्या समन्वयाने समाविष्ट २३ गावांमध्ये आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील. तसेच, येथील नाल्यांवरील १८९ ठिकाणच्या अतिक्रमणांवर पावसाळ्यापूर्वी संयुक्त कारवाई केली जाईल.

## आरोपांची राळ उठवणारे गाताहेत आमदारांचे गोडवे

# अण्णा बनसोडेंवर आधी आरोप आता गळ्यात गळे!

## राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ‘खोबरे तिकडे चांगभले’

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सहाच महिन्यापूर्वी पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे अण्णा बनसोडे हे विधानसभा सभागृहात काहीच बोलत नाहीत. मतदारसंघात फिरकत नाहीत. समस्यांबाबत आवाज उठवत नाही अशी आरोपांची राळ उठवणाऱ्यांनी आता अण्णा बनसोडे यांचे गोडवे गायला सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे पिंपरी मतदार संघाचे आमदार असलेल्या बनसोडे यांची विधानसभा उपाध्यक्षपदी निवड काय झाली त्यांचा नागरिक सत्कार करण्याचाही घाट ‘खोबरे तिकडे चांगभले” म्हणणाऱ्यांनी घातला आहे.**



विधानसभा उपाध्यक्षपदी पिंपरी विधानसभा मतदार संघाचे आमदार अण्णा बनसोडे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांचा बुधवारी (दि 9)उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याहस्ते जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. त्याबाबत माहिती देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने पत्रकार परिषद आयोजित केली होती. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे शहराध्यक्ष योगेश बहाल यांच्याकडून ही माहिती देण्यात आली. यावेळी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडल्यानंतर राष्ट्रवादी शरद पवार गट आणि अजित पवार गट विधानसभा निवडणुकीत अनेक ठिकाणी आमने-सामने आल्याचे पाहायला मिळाले. पिंपरी चिंचवड शहरातील पिंपरी विधानसभा मतदारसंघांमध्ये अजित पवार गटाच्या अण्णा बनसोडे यांच्या विरोधात शरद पवार गटाच्या सुलक्षणा शीलवंत तुतारी या चिन्हावर निवडणुकीच्या रिंगणात होत्या. त्यावेळी माजी महापौर तथा शहराध्यक्ष योगेश बहल यांच्यासह अनेकांनी अण्णा बनसोडे यांच्यावर टीकेची राळ उठवली होती. अण्णा बनसोडे सभागृहात बोलतच नाहीत. मतदारसंघात पाच वर्षांशिवाय फिरकत नाहीत. पिंपरी मतदारसंघातील झोपडपट्टी भागामध्ये कार्यकर्त्यांना दारू पाजणे हा एकमेव उद्योग अण्णा बनसोडे निवडणुकीच्या आधी करतात आणि निवडून येतात असे देखील आरोप करण्यात आले होते. विधानसभा निवडणूक पार पडली विधानसभा निवडणुकीनंतर राज्यातील राजकारणाचे चित्रच पालटून गेले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या अनेक उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला आणि शरद पवार गटाची पीछेहाट झालेली राज्याच्या राजकारणात दिसून आली. यानंतर काठावर बसलेले अनेकांनी तातडीने बेडूक उड्या मारत अजित पवार यांच्या गटात सामील झाले.

याच आरोपांचा धागा पकडत आज पत्रकार परिषदेमध्ये याबद्दल विचारल्यावर बहल म्हणाले की, अण्णा हे सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेले आहेत. ते मतदारसंघात चांगल्या मतांनी निवडून आले आहेत. त्यांना विधानसभेचे उपाध्यक्ष पद मिळाले आहे. ते निश्चित शहराचा विकास करतील असे म्हणत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला बहल यांनी बगल दिली.

### काठावर बसलेले सत्कार कार्यक्रमात सर्वात पुढे!

विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या जाहीर सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्यानंतर काठावर बसलेले, तळ्यात मळ्यात कायम भूमिका ठेवणारे अनेक जण हिरीरीने पुढे आले आहेत. विधानसभा निवडणुकीत शेवटपर्यंत आपण कोणत्या गटात आहोत हे थेटपणे न सांगणारे, शरद पवार गटाच्या उमेदवाराचा प्रचार करत महायुतीतील उमेदवाराच्या विरोधात काम करणारे माजी आमदार विलास लांडे यांनीही या सत्काराच्या कार्यक्रमात कमालीचा उत्साह दाखवला आहे. भाजपाच्या विरोधात भोसरी मतदारसंघांमध्ये भ्रष्टाचाराबद्दल वारंवार तोंडसुख घेणारे माजी आमदार आता महायुतीच्या आमदाराचा सत्कार करत आहेत यावरून चांगली चर्चा रंगली आहे.

## महापालिका आयटीआय विद्यार्थ्यांना आता विद्यावेतन

### महानगरपालिका प्रशासनाचा निर्णय, भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला यश


। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।




पिंपरी-चिंचवड महानगरपालिका संचालित आयटीआय (औद्योगिक प्रशिक्षण संस्था) मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय आयटीआयमधील विद्यार्थ्यांप्रमाणे विद्यावेतन लागू करण्याच्या प्रस्तावाला महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली आहे. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत ~~अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या सर्व~~ प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून दरमहा ५०० रुपये इतके विद्यावेतन देण्यात यावे, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली होती. त्याअनशुंगाने महानगरपालिका प्रशासनाने कार्यवाही केली आहे. दरम्यान, महानगरपालिका प्रशासनाने राज्य शासनाच्या धर्तीवर मनपा आयटीआयच्या विद्यार्थ्यांनाही ५०० रुपये इतके विद्यावेतन द्यावे, असा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठवला होता. मात्र, सदर प्रशिक्षण केवळ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत असलेल्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांनाच योजना लागू करता येईल. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा, असे कळवले होते. त्यानुसार, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन देण्याबाबत आयुक्तांनी मान्यता दिली. दरवर्षी सुमारे ९०० प्रशिक्षणार्थ्यांचे ५०० रुपये प्रमाणे ४ लाख ५० हजार रुपये प्रतिमहिना खर्च महानगरपालिका स्तरावर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, या पुढील काळात आयटीआयमध्ये ट्रेड वाढल्यास त्या विद्यार्थ्यांनाही विद्यावेतन देय राहील, असे धोरण ठरवण्यात आले आहे.

> राज्याच्या कानाकोपऱ्यातून नोकरी व व्यावसायाच्या निमित्ताने शहरात वास्तव्यास आलेल्या कुटुंबातील मुलांना महानगरपालिका आयटीआय संस्थेच्या माध्यमातून कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकतेची संधी उपलब्ध होती. सर्वसामान्य कुटुंबातील या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि शहरातील औद्योगिक कंपन्यांमध्ये कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे. या अनुशंगाने राज्य शासनाच्या धर्तीवर मनपा आयटीआयच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन मिळावे, अशी मागणी केली होती. त्याला प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळे प्रतिवर्षी सुमारे ९०० विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होणार आहे.
>
> **–महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### शंका न ठेवता नाम घ्यावे.

**नामस्मरण करायला सांगितले की लोक सबबी सांगतात. पण खरोखर, नामस्मरण करण्याच्या आड काहीच येत नाही. काम करीत असतानासुद्धा उगाचच इतर विचार मनात येतातच ना ? मग तसेच नामस्मरण करायला कोणती अडचण आहे ? उगाच दुसरे विचार करण्यापेक्षा भगवंताचे नाम घ्यावे हे बरे नाही का ? वेळ सापडताच तो व्यर्थ गप्पागोष्टीत न घालविता नामस्मरण करावे; श्रद्धा ठेवून करावे. दोन प्रवासी पायी जात होते. त्यांना भूक लागली. जाताना एक आंबराई लागली. त्यांनी मालकाला विचारले, 'आंबे घेऊ का ?' मालक म्हणाला, 'पंधरा मिनिटांत जितके आंबे खाता येतील तितके खा.' दोघांपैकी एक होता, तो मालकाजवळ चौकशी करू लागला; या शेताला पट्टी किती, मालक कोण, वगैरे पुष्कळ विचारपूस करू लागला. दुसरा मात्र भराभर आंबे खाऊ लागला. इतक्यात पंधरा मिनिटे झाली. मालकाने सांगितले, 'वेळ संपली, आता तुम्ही जा.' एकाचे पोट भरले, दुसरा मात्र उपाशी राहिला. या गोष्टीवरून हे ध्यानात घ्यायचे की, नुसते प्रश्न विचारण्यापेक्षा, श्रद्धा ठेवून नाम घेऊ लागावे. नामाचा अर्थ आपल्याला जरी कळला नाही, तरी तो भगवंताला कळतो. म्हणून नामाचे महत्त्व कळो वा न कळो, नाम घेत राहावे. ध्रुवाने काय केले ? नारदवचनावर विश्वास ठेवून नामस्मरण प्रेमाने करू लागला. तो इतर विचारांच्या, शंकाकुशंकांच्या नादी लागलाच नाही. 'एक तत्त्व नाम' हेच त्याने धरले, म्हणून त्याला नारायण प्रसन्न झाला. संत निःस्वार्थी असतात. ते तळमळीने सांगतात. त्यावर आपण श्रद्धा ठेवावी आणि नाम घ्यायला सुरुवात करावी आणि अखंड नामातच राहावे. नाम किती दिवस घेत राहावे ? नाम सोडावेसे वाटत नाही तोपर्यंत ते घ्यावे. नामात रंगून जाईपर्यंत नाम घ्यावे. नामस्मरणात रंगला की नाम सुटणारच नाही. भगवंताचे नाम हेच श्रेष्ठ आहे. त्या नामात रंगेल तोच खरा. चरित्र विसरले तरी चालेल पण नाम विसरू नये, कारण नामात सर्व चरित्र साठविलेले आहे. ज्ञान, उपासना, कर्म वगैरे मार्ग आहेत, पण सर्वांत नामस्मरण हे सोपे साधन आहे. एक मोठा किल्ला होता. तो अभेद्य होता. मुंगीलाही आत प्रवेश होणे अशक्य असा तट होता. पण त्याला एक मोठा दरवाजा होता. त्याला एक मोठे कुलूप होते. एकाला त्याची किल्ली मिळाली; मग प्रवेश सुलभ झाला. तसे नाम ही किल्ली आहे. परमार्थ कितीही कठीण असला तरी नामाने तो सुसाध्य असतो. नामावर प्रेम आणि श्रद्धा बसत नाही अशी तक्रार करतात. संतवचनावर विश्वास ठेवून अखंड नाम घ्यावे, त्यानेच समाधान होईल. बोधवचन:- आपण रोज उठल्यावर भगवंताचे स्मरण करण्याचा नियम ठेवावा. स्नान वगैरे गोष्टी झाल्या तर कराव्याच, पण त्या वाचून अडून बसू नये.**

# ही डरकाळी नव्हे नाथाभाऊ, हे तर गाढवाचे खिंकाळणे !



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक





**एकेकाळचे भाजपाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे रोजच नवीन वादात घुसत असून खड्ड्यात निघाले आहेत. वास्तविक, एकेकाळचा मुख्यमंत्रीपदाचा हा नेता केवळ हलक्या कानांमुळे आणि कोणतेही ठोस धोरण नसल्यामुळे मागे पडत चालला आहे..आता तर संपत चालला आहे !**

### शिष्य केव्हाच गेले पुढे निघून..-

एकनाथ खडसेंना गुरु मानणारे भाजपामधील त्यांचे अनेक शिष्य आता कुठल्या कुठे पोहोचले असून जळगावात बसलेला नाथाभाऊ त्यांच्या नावाने बोटे मोडण्याशिवाय काहीही करत नाहीत. २०१४ मध्ये ज्यावेळी देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाले, त्यावेळी स्पर्धेतील नाव हे एकनाथ खडसे यांचे होते, हे लक्षात घ्या..

### पाहा, गिरीश महाजन कुठे पोहोचले?

जळगावच्या राजकारणात अगदीच ज्युनिअर असणारे गिरीश महाजन कुठल्या कुठे पोहोचले आणि आपल्याला डावलल्याची भावना सतत डोक्यात ठेवून सूडाचे बोल बोलणारे नाथाभाऊ मात्र घरातच बसले ! बदलत्या राजकारणात बदल घडवून आणला नाही, तर राजकारणात कुजून जाण्याचा योग येतो, आणि तेच नेमके नाथाभाऊंच्या नशिबी आले आहे. भरकटलेला हा वारू सध्या शरद पवार गटाच्या किनाऱ्यावर स्थिरावला आहे..ना पद हातात, ना कार्यकर्ता !

### नक्कीच ज्येष्ठ.. काडीचा आधारही नाही !

कोणताही राजकीय पक्ष मोठा होत असताना अनेकांवर अन्याय होत असतात. पण, वाऱ्याचा रोख लक्षात घेऊन पावले टाकणारा यशस्वी होतो. नाथाभाऊंची पावले नेमकी उलट दिशेला पडली आणि ते त्यांना कळले सुद्धा नाही. विनोद तावडे, पंकजा मुंडे हे अन्याय झालेले दोन नेते पुन्हा मूळ रुळावर आले, पक्षात मोठा जम बसवला. पण, त्यांचे मार्गदर्शक नाथाभाऊ मात्र कायम अन्यायाच्या गर्तेतच चाचपडत राहिले. आता, तर वय झाले आहे आणि काहीही बोलले तरी त्याचा संबंध विरोधक म्हातारपणाशी लावतात ही वेळ आली आहे!

### शरीर आणि मन, दोन्हीही लंगडेच !

कोणी अडचणीत आले की सल्ला न देणारा आळशी.. तशी नाथाभाऊंची अवस्था झाली आहे. नाथाभाऊ, लंगडत धावणाऱ्या बैलाने शंकरपटात भाग घ्यायचा नसतो, असा एकाने सल्ला दिला आहे. शरीराचा तंबू.. तोंडाचा चंबू झालेल्या वृद्धाने सुंदर तरुणीशी लग्नगाठ बांधायची नसते किंवा भसाड्या आवाजाच्या एकाद्या म्हातारीने मला आमच्या गावातली लता मंगेशकर म्हणतात, अशी थाप मारायची नसते ! असे डायलॉग जळगावमध्ये सर्रासपणे मारले जातात, ते नाथाभाऊंना उद्देशून !

### प्रत्येक वेळी चुकीचेच धोरण कसे?

नाथाभाऊ, हे ज्यावेळी पाऊल उचलतात, ते नेमके चुकीचेच कसे काय, हा एक न सुटणारा प्रश्न आहे. राजकीय धोरण मांडताना, नव्याने पुन्हा तोरण बांधताना घेतलेली भूमिका चुकीचीच कशी काय हो नाथाभाऊ ? उपयोग शून्य असतांना आणि चारही बाजूंनी अपयशाने खचाखच भरलेले असताना चार पावले मागे घेत खुबीने राजकीय शत्रुत्व संपविण्याची मोठी गरज असते, असे वाटत नाही का?

### महाजन कुठल्या कुठे पोहोचले ?

गेल्या अनेक वर्षांपासून ज्याच्या नेतृत्वाने खानदेशच्या पंचक्रोशीत मोठी झेप घेतली आहे, त्या गिरीश महाजन यांना ऊठसूठ डिवचण्याचे, खिजवण्याचे फाजील प्रयोग तुम्ही थांबवायची गरज असतांना तुम्ही मात्र, बुडत्याचा पाय खोलात पद्धतीची चुकीची भूमिका स्वीकारता आणि मुख्य राजकीय प्रवाहातून आणखी बाजूला फेकले जाता, हे कधी लक्षात आले नाही का हो? तुम्ही फडणवीस, महाजनांच्या दिशेने मारलेले सारेच बाण निष्प्रभ ठरलेले आहेत, तरीही गप्प न बसता तद्दन थापाड्या अशा एखाद्या पत्रकाराने टाकलेल्या खोट्या व्हीडिओचा आधार घेत काहीतरी सनसनाटी उडवण्याचा तुम्ही प्रयत्न करता, किती हे चीप?

### म्हातारपणी पोरकट प्रयत्न..

राजकीय मळमळ आणि खळबळ माजविण्याचा तुमचा पोरकट प्रयत्न पाहून त्यावर हसावे की रडावे, हेच नेमके जळगाव, धुळे, नाशिक परिसरातील मतदारांना अजिबात समजेनासे झाले आहे. तुमच्याकडे महाजनांना अडचणीत आणण्यासाठी पुरेसे पुरावे नाहीत. याचा अर्थ महाजन पुरावे नष्ट करतात, असे नाही तर भानगडी करायलाच त्यांच्याकडे वेळ नाही. अगदी तुमच्याही भानगडींचे पुरावे त्यांच्याकडे असूनही त्यांना ते बाहेर काढून तुमचे वृद्धत्व अधिक क्लिष्ट करावे, असे मनातून अजिबात वाटत नसावे, हे लक्षात घ्या.

### कितीतरी गूढ गोष्टी आणि भंबेरी !

समजा, महाजनांनी पत्रकार परिषद घेत जर तुमच्या मुलाचा संशयास्पद मृत्यू आणि तुमच्या पत्नीने तुम्हाला किडनी दान केलेलीच नाही, तर ज्याने ती दान केली, तो वीस वर्षांचा तरुण त्यातून मृत्यू पावला, यापद्धतीने एका पाठोपाठ एक आरोप तुमच्यावर केले, तर प्रकरण कोणत्या थराला जाईल, याची नुसती कल्पना करा! नाथाभाऊ, शांत राहा, हा सबुरीचा सल्ला. त्या महाजन यांच्यावर उगाच खोटे आरोप करू नका, नाहीतर त्या महाजनांच्या पाठीशी संपूर्ण सरकार आहे, तुम्ही एकाकी आहात..ज्या पक्षात तुम्ही आहात त्यांच्याकडे देखील तुम्हाला वाचवण्याची ताकद नाही हो !

### बोलण्यामागे नुसते उसने अवसान..

तुमच्या डरकाळ्या आता वाघाच्या नसून ती गाढवाची किंकाळी वाटत आहे, तुमचे बोलणे म्हणजे उसने अवसान आहे, मीडियाच्या ते लगेच लक्षात येते, म्हणूनच विधानसभा निवडणुकीत तुम्ही जेव्हा जामनेरात जाऊन मी गिरीश महाजन यांचे डिपॉझिट जप्त करून येईन, असे म्हणाला त्यावेळी कोणीही त्याची दखल घेतली नाही. कल्पनेपेक्षा कितीतरी अधिक पटींनी मते घेत गिरीश महाजन निवडून आले. मुलाकडे तुमचे दुर्लक्ष झाले, त्यातून त्याने आत्महत्या करणे पसंत केले.. निदान त्यानंतर आपले राजकीय अस्तित्व निर्माण करून सत्तेत स्थान मिळविणाऱ्या आणि मोठे मन ठेवून ज्याने स्नुषा रक्षा यांना सत्तेत स्थान मिळवून देण्यात मोलाची महत्वाची भूमिका बजावली, त्या गिरीश महाजन यांना तरी वारंवार न डिवचण्याचे कार्य तुमच्या हातून घडावे, अशी प्रत्येकाची इच्छा आहे.

### विधवा सुनेच्या ताटातही विष..

थेट विधवा सुनेच्या ताटातही विष कालवण्याची तुमची विचित्र आणि विक्षिप्त भूमिका केवळ गिरीश महाजनांच्या द्वेषापोटी आहे हे स्पष्ट दिसते. नकळत तुम्ही कुटुंब सदस्यांच्याही मनातून उतरत आहात.

### दगाफटका करण्याचा मूळ स्वभाव

भाजपामध्ये प्रवेशास नकार कळवताच पुन्हा तो दगाफटका करण्याचा स्वभाव उफाळून वर आणायचा, त्यातून संघ आणि भाजपामधल्या प्रत्येकाची तुमच्या प्रति असलेली सहानुभूती केव्हाच संपलेली आहे, तुम्हाला राजकारणात पुन्हा पूर्वीचे वैभव म्हणजे एखाद्या मृतदेहाच्या मनात, मी पुन्हा उठून पूर्वीसारखा चालायला लागेन, असे येण्यासारखे ! जेथे आता तुम्हाला तुमच्या विधानसभा मतदारसंघात तुमच्या गावात यश नाही, ज्याचे परिणाम तुमच्या कन्येला विनाकारण भोगावे लागत आहेत, उगाच आगपाखड करून आता यापुढे काडीचाही उपयोग नाही, हे सुद्धा तुमच्या लक्षात येत नाही का हो ?

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राज्याचे वाळू धोरण जाहीर!

## आता घरकुलांसाठी 5 ब्रासपर्यंत मोफत वाळू मिळणार

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज (८ एप्रिल) राज्याच्या मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली आहे. या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील आदी सदस्य उपस्थित होते. या बैठकीत राज्यातील विविध विकास कामांचा आढावा घेण्यात आला. तसेच राज्यातील विकास कामाच्या प्रश्नांवरही चर्चा झाली. यावेळी ९ मोठे निर्णय घेण्यात आले आहेत.**





आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांमध्ये राज्यभरातील घरकुलांसाठी ५ ब्रासपर्यंत मोफत वाळू देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र अधिनियम-१९७१ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे झोपडपट्टी पुनर्वसनाला गती मिळणार आहे. तसेच राज्यातील शासकीय आयुर्वेद/होमिओपॅथी/युनानी/योग व निसर्गोपचार महाविद्यालयांतील कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर भरावयाच्या अध्यापकांचे दरमहा एकत्रित ठोक मानधन निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयाबाबत माहिती देताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं की, “आता राज्यात वाळू डेपो पद्धत बंद होणार आहे. आता लिलाव पद्धतीने वाळू विक्री होणार आहे, म्हणजे एका रेती घाटासाठी दोन वर्षांचा लिलाव करण्यात येईल. तसेच विभागात जेवढे उपविभाग आहेत ते एकत्र करून दोन वर्षांचा लिलाव करण्याची योजना आहे. तसेच खाडी पात्रासाठी ही मान्यता तीन वर्षांची असेल. तसेच जी घरकुलं आहेत त्या घरकुलांच्या कामासाठी आपण ५ ब्रासपर्यंत मोफत वाळू देणार आहोत. प्रत्येक वाळू घाटावर घरकुलांसाठी १० टक्के वाळू घरकुलांच्या कामांसाठी आरक्षित ठेवणार आहोत”, अशी माहिती मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर व पुणे या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या हद्दीतील शासकीय जमिनी संबंधित प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करणार, यातून विकास कामांना वेग येणार (नगर विकास) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा निर्मुलन व पुनर्वसन) अधिनियम-१९७१ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय; झोपडपट्टी पुनर्वसनाला गती मिळणार (गृहनिर्माण) वांद्रे रिक्लेमेशन व आदर्श नगर (वरळी) या दोन म्हाडा अभिन्यासातील इमारतींचा C&DA मार्फत एकत्रित पुनर्विकास करण्याचा निर्णय (गृहनिर्माण) राज्याचे वाळू- रेती निर्गती धोरण-२०२५ जाहीर (महसूल) सिंधी विस्थापितांचे पट्टे नियमित करण्यासाठी धोरण विशेष अभय योजना-२०२५ (महसूल)नागपूर येथे राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेची स्थापना करण्यात येणार (आपत्ती व्यवस्थापन,मदत व पुनर्वसन) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणाकर्मचारी यांना पूर्वलक्षी प्रभावाने एक व दोन लाभांची ‘सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना’ लागू करण्याचा निर्णय (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये)

### चंद्रशेखर बावनकुळे काय म्हणाले?

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयाबाबत माहिती देताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं की, “आता राज्यात वाळू डेपो पद्धत बंद होणार आहे. आता लिलाव पद्धतीने वाळू विक्री होणार आहे, म्हणजे एका रेती घाटासाठी दोन वर्षांचा लिलाव करण्यात येईल. तसेच विभागात जेवढे उपविभाग आहेत ते एकत्र करून दोन वर्षांचा लिलाव करण्याची योजना आहे.त्या घरकुलांच्या कामासाठी आपण ५ ब्रासपर्यंत मोफत वाळू देणार आहोत. प्रत्येक वाळू घाटावर घरकुलांसाठी १० टक्के वाळू घरकुलांच्या कामांसाठी आरक्षित ठेवणार आहोत”, अशी माहिती मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

# कामरा मुंबईत आल्यावर स्वागत करणार

## मंत्री संजय शिरसाट यांनी कुणाल कामराला मोठा इशाराही दिला

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**स्टॅण्डअप कॉमेडियन कुणाल कामराने काही दिवसांपूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणं सादर केलं होतं. यावरून कुणाल कामराच्या विरोधात शिवसेना (शिंदे) पक्षाचे कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं होतं. यामुळे राज्यात एका नव्या वादाला तोंड फुटलं होतं. या प्रकरणी कुणाल कामराच्या विरोधात गुन्हाही दाखल झाला. मुंबई पोलिसांनी कुणाल कामराला चौकशीसाठी तीन वेळा समन्स बजावलं.**





तसेच कुणाल कामराला मद्रास उच्च न्यायालयाने १७ एप्रिलपर्यंत अटकेपासून संरक्षण दिलं आहे. तसेच दुसरीकडे कुणाल कामराने मुंबई उच्च न्यायालयात देखील धाव घेतली असून पोलिसांनी दाखल केलेला एफआयआर रद्द करण्याची मागणी केलेली आहे. या संपूर्ण प्रकरणासंदर्भात आता शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते तथा मंत्री संजय शिरसाट यांनी प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी संजय शिरसाट यांनी कुणाल कामराला मोठा इशाराही दिला आहे. कुणाल कामरा मुंबईत आल्यावर जरूर स्वागत करणार असल्याचं शिरसाट यांनी म्हटलं आहे.कुणाल कामराच्या गाण्यानंतर राज्यात एका नव्या वादाला तोंड फुटल्याच्या संदर्भात शिरसाट यांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी प्रश्न विचारला. यावेळी बोलताना संजय शिरसाट म्हणाले की, “कुणाल कामरा लोकांना गद्दार म्हणत आहे. मात्र, कामरा जेव्हाही मुंबईत येईल तेव्हा जशास तसं उत्तर दिलं जाईल. त्याच्यावर कायदेशीर कारवाई नक्कीच होईल. तसेच कुणाल कामरा मुंबईत आल्यानंतर स्वागत करावंच लागेल. कारण तो एवढा मोठा व्यक्ती आहे, मोठा स्टार आहे. त्याचं स्वागत आम्ही जरूर करणार”, असा इशारा संजय शिरसाट यांनी दिला आहे. स्टॅण्डअप कॉमेडिअन कुणाल कामराने काही दिवसांपूर्वी आपल्या एका शोमध्ये राज्यातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करत टीका केली होती. यामध्ये कुणाल कामराने शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या फुटीचा संदर्भ दिला होता. यामध्ये कुणाल कामरा शोमध्ये म्हटलं होतं की, “महाराष्ट्राच्या निवडणुकीत त्यांनी काय केलं आहे, त्यांना सांगावं लागेल. आधी शिवसेना भाजपामधून बाहेर पडली, नंतर शिवसेना शिवसेनेतून बाहेर पडली. राष्ट्रवादी काँग्रेस राष्ट्रवादीतून बाहेर पडली”, असं म्हणत कुणाल कामराने शोमध्ये एकनाथ शिंदे यांच्याबाबत एक व्यंगात्मक गाणंही सादर केलं

### विडंबनात्मक गाणं सादर केलं होतं

होतं. मात्र, व्यंगात्मक गाणं सादर केल्यानंतर शिवसेनेच्या (शिंदे) कार्यकर्त्यांनी मुंबईतील खारमधील कार्यक्रमस्थळाच्या स्टुडिओची तोडफोड केली होती. तसेच कुणाल कामराच्या विरोधात तक्रारी दाखल केली होती.स्टॅण्डअप कॉमेडियन कुणाल कामराने काही दिवसांपूर्वी विडंबनात्मक गाणं सादर केलं होतं.

# डोनाल्ड ट्रम्प यांचा चीनला धक्का!

## चीनच्या वस्तूंवर लादला 104 टक्के आयात कर, 'व्हाईट हाऊस'कडून घोषणा

।ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेचे सूत्रं हाती घेतल्यापासून अनेक मोठ्या निर्णयांचा धडाका लावला आहे. ट्रम्प यांनी घेतलेल्या काही प्रमुख निर्णयांमध्ये नवीन टॅरिफ धोरण (आयात शुल्क), बेकायदेशीर स्थलांतरितांचा मुद्दा, अमेरिकेतील कर्मचारी कपातीचा निर्णयासह अनेक देशांवर अतिरिक्त व्यापारी कर लादण्याच्या निर्णयांचा समावेश आहे. डोनाल्ड ट्रम्प घेत असलेल्या निर्णयांचा फटका जगभरातील अनेक देशांना बसला आहे. एवढंच नाही तर ट्रम्प प्रशासनाच्या टॅरिफ धोरणामुळे जगभरातील अनेक देशांच्या शेअर बाजारातही मोठे परिमाण पाहायला मिळाले आहेत.**



जगभरातील अनेक देशांवर टॅरिफ लागू करण्याच्या निर्णयावर आंतरराष्ट्रीय वर्तुळातून तीव्र पडसाद उमटत आहेत. आता डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनला मोठा धक्का दिला आहे. चीनमधून आयात होणाऱ्या सर्व वस्तूंवर १०४ टक्के इतका मोठा कर लादण्याची घोषणा ट्रम्प प्रशासनाने केली आहे. या निर्णयाची व्हाईट हाऊसने पुष्टी केली असून ८ एप्रिलच्या मध्यरात्रीपासून हे नवीन शुल्क लागू होणार आहेत. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.अमेरिकेने चीनवर १०४ टक्के कर लादल्याच्या निर्णयाची माहिती व्हाईट हाऊसने दिली आहे. दरम्यान, अमेरिकेने आधी चीनवर ३४ टक्के आयात शुल्क लावलं होतं. मात्र, अमेरिकेने चीनवर लादलेल्या या ३४ टक्के आयात शुल्कानंतर चीनने देखील अमेरिकन वस्तूंवर ३४ टक्के आयात शुल्क लावण्याची भूमिका घेतली होती. दरम्यान, चीनने अमेरिकेच्या वस्तूंवर ३४ टक्के आयात शुल्क लावण्याच्या निर्णयावर डोनाल्ड ट्रम्प यांनी इशारा दिला होता की चीनने ८ एप्रिलपर्यंत ३४ टक्के कर मागे घेतला नाही तर अमेरिका ५० टक्के अतिरिक्त कर लादेल.दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमकीपुढे चीनने झुकण्यास नकार दिला. तसेच जशास तसे उत्तर देण्याची भूमिका चीनने घेतली होती. यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनला मोठा धक्का देत चीनमधून अमेरिकेत आयात होणाऱ्या सर्व वस्तूंवर १०४ टक्के इतका मोठा कर लादण्याची घोषणा केली आहे. मार्चमध्ये २० टक्के कर आणि गेल्या आठवड्यात ३४ टक्के कर लादण्याचा निर्णय घेतला होता. यानंतर आज थेट ५० टक्के अतिरिक्त कर लादण्याच्या घोषणेमुळे चिनी आयातीवरील एकूण कर १०४ टक्क्यांवर पोहोचले आहेत.अमेरिकेनंतर चीननेही प्रत्युत्तरादाखल अमेरिकेवर ३४ टक्के आयात शुल्क लादले. हे आयात शुल्क मागे घेण्याकरता डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनला अल्टिमेटम दिला असून असे न केल्यास चीनवर ९ एप्रिलपासून ५० टक्के आयात शुल्क लादण्याचा इशारा दिला होता. अमेरिकेच्या या इशाऱ्याला चीननेही प्रत्युत्तर दिलं होतं. "टॅरिफ ब्लॅकमेल"ला चीन घाबरणार नाही", असं चीनने म्हटलं होतं. "चीनविरुद्ध शुल्क वाढवण्याची अमेरिकेची धमकी ही एक चूक आहे. यामुळे अमेरिकेची ब्लॅकमेलिंगची सवय पुन्हा एकदा स्पष्ट होतेय, जर अमेरिकेने आयात शुल्क मागे घेतले नाहीत तर चीन शेवटपर्यंत लढेल," असे चीनच्या मंत्रालयाने म्हटलं होतं.जगभरातील अनेक देशांवर टॅरिफ लागू करण्याच्या निर्णयावर आंतरराष्ट्रीय वर्तुळातून तीव्र पडसाद उमटत आहेत. आता डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनला मोठा धक्का दिला आहे. चीनमधून आयात होणाऱ्या सर्व वस्तूंवर १०४ टक्के इतका मोठा कर लादण्याची घोषणा ट्रम्प प्रशासनाने केली आहे. या निर्णयाची व्हाईट हाऊसने पुष्टी केली असून ८ एप्रिलच्या मध्यरात्रीपासून हे नवीन शुल्क लागू होणार आहेत. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.अमेरिकेने चीनवर १०४ टक्के कर लादल्याच्या निर्णयाची माहिती व्हाईट हाऊसने दिली आहे.

### मोठा कर लादण्याची घोषणा

दरम्यान, अमेरिकेने आधी चीनवर ३४ टक्के आयात शुल्क लावलं होतं. मात्र, अमेरिकेने चीनवर लादलेल्या या ३४ टक्के आयात शुल्कानंतर चीनने देखील अमेरिकन वस्तूंवर ३४ टक्के आयात शुल्क लावण्याची भूमिका घेतली होती. दरम्यान, चीनने अमेरिकेच्या वस्तूंवर ३४ टक्के आयात शुल्क लावण्याच्या निर्णयावर डोनाल्ड ट्रम्प यांनी इशारा दिला होता की चीनने ८ एप्रिलपर्यंत ३४ टक्के कर मागे घेतला नाही तर अमेरिका ५० टक्के अतिरिक्त कर लादेल.,यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनला मोठा धक्का देत चीनमधून अमेरिकेत आयात होणाऱ्या सर्व वस्तूंवर १०४ टक्के इतका मोठा कर लादण्याची घोषणा केली आहे.

# वक्फविरोधातील निदर्शनाला हिंसक वळण

## अनेक ठिकाणी दगडफेक, जाळपोळ, मुर्शिदाबाद शहरात तणाव

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**वक्फ सुधारणा विधेयक नुकतंच संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर करण्यात आलं आहे. या विधेयकावरून सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये गेल्या काही दिवसांपासून आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडत होत्या. तसेच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देखील वक्फ सुधारणा विधेयकाला मंजूरी दिली आहे. त्यामुळे आता या विधेयकाचं कायद्यात रूपांतर झालं आहे. मात्र, अद्यापही देशातील विविध ठिकाणी वक्फ सुधारणा विधेयकाच्या विरोधात आंदोलन करत निषेध व्यक्त केला जात विधेयक मागे घेण्याची मागणी केली जात आहे.**



आता पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबादमध्ये वक्फ सुधारणा विधेयकावरून हिंसाचार उफाळला आहे. आज मुर्शिदाबादमध्ये वक्फ सुधारणा विधेयकाच्याविरोधात आंदोलन करण्यात आलं होतं. यावेळी आंदोलकांनी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. मात्र, यानंतर या आंदोलनाला हिंसक वळण लागलं. मुर्शिदाबादमधील अनेक ठिकाणी दगडफेक आणि वाहनांची तोडफोड करण्यात आली. तसेच अनेक ठिकाणी वाहनांची जाळपोळ करत मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात आलं. यानंतर मुर्शिदाबादमध्ये मोठा तणाव निर्माण झाला असल्याची माहिती सांगितली जात आहे.मुर्शिदाबादमध्ये वक्फ सुधारणा विधेयकाविरुद्ध निदर्शने करण्यासाठी मोठा जमाव जमला एकत्र आला होता. यावेळी आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक करत तेथील एक महामार्ग रोखण्याचाही प्रयत्न केला. यानंतर पोलिसांनी आंदोलकांना रोखण्याचा प्रयत्न केला असता काही आंदोलक आणि पोलिसांमध्ये झटापट झाल्याचंही सांगितलं जात आहे. तसेच यावेळी पोलिसांच्या गाड्या देखील पेटवण्यात आल्या आहेत. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.यामुळे मुर्शिदाबादमध्ये मोठा तणाव निर्माण झाल्याचं पाहायला मिळालं. मात्र, पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली असून सध्या मुर्शिदाबादमध्ये मोठ्या प्रमाणात पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. तसेच सध्या तणावपूर्ण शांतता असल्याचं सांगितलं जात आहे. दरम्यान, मुर्शिदाबादमधील हिंसाचाराच्या या घटनेवरून भाजपाचे नेते अमित मालवीय यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर जोरदार टीका केली आहे.अमित मालवीय यांनी म्हटलं की,"मुर्शिदाबादच्या रस्त्यांवरून उसळणाऱ्या हिंसक इस्लामी जमावाला लगाम घालण्यासाठी पश्चिम बंगाल पोलीस संघर्ष करत आहेत.

### वक्फवरून हिंसाचार उफाळला

मात्र,कदाचित ममता बॅनर्जी यांच्या सूचनांनुसार किंवा त्यांच्या प्रक्षोभक भाषणांमुळे सध्याच्या परिस्थितीला हातभार लागला असावा", अशी टीका अमित मालवीय यांनी केली.आता पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबादमध्ये वक्फ सुधारणा विधेयकावरून हिंसाचार उफाळला आहे.

# डिंपल कपाडियांची नात?



दिवंगत अभिनेते राजेश खन्ना व डिंपल कपाडिया यांच्या दोन्ही मुली ट्विंकल आणि रिंकी खन्ना यांनी चित्रपटसृष्टीत नशीब आजमावले; पण त्यांना फार यश मिळाले नाही. काही चित्रपट केल्यानंतर, ट्विंकल आणि रिंकी या दोघांनीही बॉलीवूडला अलविदा केलं. ट्विंकलने अक्षय कुमारशी लग्न केलं, तसेच तिला पुस्तकांची आवड असल्याने तिने काही पुस्तकं लिहिली. पती इंडस्ट्रीत असल्याने ट्विंकल कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. मात्र, रिंकी खन्ना बॉलीवूडच्या झगमगाटापासून खूप दूर आहे. सध्या रिंकी नाही, पण तिच्या लेकीने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. नाओमिकाने मॅडॉक फिल्म्सच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित पार्टीला तिची आजी डिंपल कपाडियासह हजेरी लावली. या पार्टीत नाओमिकाने तिच्या लुक आणि स्टाइलमुळे लोकांचे लक्ष वेधून घेतले. काळ्या रंगाच्या शॉर्ट ड्रेसमध्ये नाओमिका खूपच सुंदर दिसत होती. नाओमिकाने ड्रेससोबत गोल्डन स्टेटमेंट ज्वेलरी, ब्लॅक पर्स आणि ब्लॅक हील्स घातल्या होत्या. तिने केस मोकळे सोडले होते. नाओमिका या लूकमध्ये खूपच सुंदर आणि स्टायलिश दिसत होती. सोशल मीडियावर नाओमिकाचा आजीबरोबरचा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर लोक तिचं कौतुक करत आहेत. ही किती सुंदर दिसते, हिचे डोळे आजोबांसारखे आहेत, अशा कमेंट्स नाओमिकाच्या व्हिडीओवर पाहायला मिळत आहेत. रिंकी खन्ना आणि उद्योगपती समीर सरन यांची मुलगी नाओमिका सरन मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजमधून शिक्षण पूर्ण केल्यानंतर आता लंडनमध्ये उच्च शिक्षण घेत आहे. नाओमिका सरन बॉलीवूडमध्ये पदार्पण करण्याच्या तयारीत आहे. पीपिंग मून डॉट कॉमच्या एका रिपोर्टनुसार, दिनेश विजन राजेश खन्ना यांची नात नाओमिका सरन हिला बॉलीवूडमध्ये ब्रेक देऊ शकतात. अमिताभ बच्चन यांचा नातू अगस्त्य नंदा याच्याबरोबर मॅडॉक फिल्म्स बॅनरखाली तयार होणाऱ्या एका रोमँटिक-कॉमेडी चित्रपटात नाओमिकाला लाँच करण्याच्या चर्चा सुरू आहेत.

# मयुरीने सिनेइंडस्ट्रीला अलविदा केले



घर से निकलते ही...कुछ दूर चलते ही...' या लोकप्रिय गाण्यातील अभिनेत्री तुम्हाला आठवतेय का? या गाण्यात झळकलेल्या अभिनेत्रीचं नाव मयुरी कांगो असं आहे. एकेकाळी अनेक चित्रपट व टीव्ही मालिका करणाऱ्या मयुरीने सिनेइंडस्ट्रीला अलविदा केलं आणि स्वतःचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी मेहनत घेतली. आता ती गुगलमध्ये उच्च पदावर काम करतेय. १५ ऑगस्ट १९८२ रोजी महाराष्ट्रातील तत्कालीन औरंगाबाद इथे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते भालचंद्र कांगो व अभिनेत्री सुजाता कांगो यांच्या घरी मयुरीचा जन्म झाला. मयुरी ही तिच्या आई-वडिलांची एकुलती एक मुलगी आहे. मयुरीने तिचे शालेय शिक्षण सेंट फ्रान्सिस स्कूल, औरंगाबाद इथून घेतले. तिने पुढील शिक्षण देवगिरी कॉलेजमधून पूर्ण केले. मयुरी अभ्यासात हुशार होती आणि लहानपणापासूनच तिने मोठ्या कंपनीची सीईओ व्हायचं स्वप्न पाहिलं होतं, पण आईमुळे ती अभिनेत्री झाली. १२वीत असताना मयुरी आईबरोबर मुंबईत आली होती. दिग्दर्शक सईद अख्तर मिर्झा यांनी मयुरीला पाहिलं आणि तिला चित्रपटाची ऑफर दिली. मयुरीने ऑफर स्वीकारली. तिच्या 'नसीम' नावाच्या या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. मयुरीने नंतर आयआयटी कानपूरमध्ये शिकत असताना चित्रपटासाठी शिक्षण अर्ध्यावर सोडलं. तिने अजय देवगण, महेश बाबू आणि संजय दत्त यांसारख्या बड्या कलाकारांसह काम केलं.

## अखेर 'रेड २' प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज

सहा वर्षांपूर्वी २०१८मध्ये अजय देवगणचा 'रेड' चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. 'रेड'मध्ये अजय देवगण व सौरभ शुक्ला यांच्यातील द्वंद्व प्रेक्षकांच्या खूप पसंतीस पडलं होतं. तेव्हापासून 'रेड' चित्रपटाच्या सीक्वेलची प्रेक्षक प्रतीक्षा करत होते. अखेर 'रेड २' प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज झाला आहे. नुकताच या चित्रपटाचा जबरदस्त ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. ज्यामध्ये अजय देवगणपेक्षा रितेश देशमुख चांगलाच भाव खाऊन गेला आहे. त्यामुळे रितेशचं भरभरून कौतुक होतं आहे 'रेड २' चित्रपटाच्या ट्रेलरच्या सुरुवातीला अजय देवगणने साकारलेल्या अमय पटनायकची एन्ट्री पाहायला मिळत आहे. त्यानंतर अमय, दादा मनोहर भाई म्हणजे खलनायक रितेश देशमुखच्या घरावर छापेमारी करण्यासाठी पोहोचलेला दाखवण्यात आला आहे. यावेळीही छापेमारीत काही मिळत नाही. पण शेवटी चित्रपटाच्या कथेत मोठा ट्विस्ट पाहायला मिळणार आहे. संपूर्ण 'रेड २'च्या ट्रेलरमध्ये रितेश देशमुख अजय देवगणवर भारी पडल्याचं चित्र दिसत आहे. यामध्ये सौरभ शुक्ला जेलमध्ये पाहायला मिळत आहे. तसंच सुप्रिया पाठक वृद्ध महिलेच्या भूमिकेत दिसत आहे. ट्रेलरमधील प्रत्येक सीनमध्ये सस्पेन्स आहे. तर अजय व रितेश यांच्यातील शाब्दिक युद्धाने ट्रेलर आणखी धमाकेदार झाला आहे. ट्रेलरमध्ये तमन्ना भाटियाच्या आयटम साँगची झलक पाहायला मिळत आहे. 'रेड २' चित्रपटाचा ट्रेलर पाहून नेटकऱ्याने रितेश देशमुखचं कौतुक केलं आहे. एका नेटकऱ्याने लिहिलं, "रितेशला नक्कीच खलनायकाच्या भूमिकेसाठी फिल्मफेअर आणि आयफा पुरस्कार मिळेल." दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "रितेश देशमुखच्या दमदार अभिनयाची जादू पाहायला मिळत आहे." तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "जेव्हा रितेश खलनायकाची भूमिका साकारतो, तेव्हा मला लगेच कळतं काहीतरी खास असणार आहे." चौथ्या नेटकऱ्याने लिहिलं की, रितेशची भूमिका पूर्ण चित्रपटाचा जीव असणार आहे.

# स्वरा भास्करची पोस्ट चर्चेत



इस्रायलकडून सातत्याने गाझा पट्टीवर हल्ले सुरु झाले आहेत. या घटनेनंतर संपूर्ण जग हादरले आहे. अनेकजण सोशल मीडियाच्या माध्यमातून यावर प्रतिक्रिया देताना दिसत आहेत. अशातच अभिनेत्री स्वरा भास्करनेही (SWARA BHASKAR) सोशल मीडियावर याबद्दलची पोस्ट शेअर केली आहे. पोस्ट शेअर करत तिने इस्रायली हल्ल्यांचा निषेध केला आहे. तसंच गाझावरील हल्ल्यांबद्दल तिने आपले मत व्यक्त केलं आहे आणि या पोस्टमधून इस्रायल मानवजातीकडून मानवता हिरावून घेत असल्याचंही तिने म्हटलं आहे. स्वराने तिच्या इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर केली आहे, ज्यात तिने पहिल्या पोस्टमध्ये असं म्हटलं आहे की, "मी दररोज तयार होते, मेकअप करते आणि सेल्फी पोस्ट करते, मी आनंदी राहण्याचा प्रयत्न करते. या प्रयत्नात, मी माझ्या मुलीबरोबर खेळाच्या अनेक दिवसांचे आणि वाढदिवसाच्या पार्ट्यांचे फोटो काढते आणि रील बनवते. मी निरुपयोगी जीवनशैलीच्या पोस्ट स्क्रोल करते, इंटरनेटवर ज्या गोष्टींची मला गरज नाही अशा गोष्टी खरेदी करते. फक्त स्वतःचं मन वळवण्यासाठी. पण अत्याचारांचे चित्र माझ्या मनातून जात नाही." यापुढे तिने म्हटलं आहे की, "दररोज मी रडणारे पालक त्यांच्या मृत मुलांना हातात घेऊन उभे असलेले पाहते. ज्या मुलांचे शरीर इस्रायली बॉम्बने उडवले होते. कुठेतरी लोक त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे मृतदेह घेऊन जात आहेत तर कुठेतरी एखाद्या व्यक्तीला तंबूत जिवंत जाळण्यात आले आहे. आपण मानवांचा नरसंहार, सर्वात भयानक युद्ध, घृणास्पद आणि अमानुषता आपल्या फोनवर लाईव्ह पाहत आहोत आणि आम्ही त्याबद्दल काहीही करू शकत नाही." आपण सर्व हळूहळू मरत आहोत. इस्रायल केवळ गाझा आणि पॅलेस्टाईनचा नाश करत नाहीत, तर ते मानवतेपासून मानवता हिरावून घेत आहे.

# लखनौचा अखेरच्या चेंडूवर थरारक विजय!

## सुपर जायंट्सचे गोलंदाज ठरले मॅचविनर, रहाणेची खेळी व्यर्थ

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**लखनौ सुपर जायंट्स संघाने उत्कृष्ट कामगिरीसह अखेरीस केकेआर संघावर ४ धावांनी थरारक विजय मिळवला. ईडन गार्डन्सच्या मैदानावर लखनौने प्रथम फलंदाजी करत २३९ धावांचा मोठा डोंगर उभारला. लखनौकडून मिचेल मार्श आणि निकोलस पुरन यांनी वादळी फलंदाजी करत संघाला मोठी धावसंख्या उभारून दिली. पण प्रत्युत्तरात केकेआरने घरच्या मैदानावर चांगली सुरूवात केली. तरीही सुपर जायंट्सच्या संघाने अखेरच्या षटकांमध्ये भेदक गोलंदाजी करत केकेआरच्या धावांवर आळा घातला आणि अखेरीस विजय नोंदवला.**



लखनौचा संघ या विजयासह गुणतालिकेत चौथ्या स्थानी पोहोचला आहे. अखेरच्या षटकात केकेआरला विजयासाठी २४ धावांची गरज होती. रवी बिश्नोईकडे गोलंदाजीची संधी होती. हर्षित राणाने पहिल्याच चेंडूवर चौकार लगावला. तर दुसरा चेंडू डॉट बॉल गेला. यानंतर तिसऱ्या चेंडूवर हर्षितने एक धाव घेत रिंकूला स्ट्राईक दिली. आता केकेआरला विजयासाठी १९ धावांची गरज होती. रिंकूने पुढच्या दोन चेंडूवर दोन चौकार तर अखेरच्या चेंडूवर षटकार लगावला, मात्र संघाला विजय मात्र मिळवून देऊ शकला नाही.लखनौने दिलेल्या २४० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना केकेआरची सुरूवात फारच दणक्यात झाली. केकेआरने पॉवरप्लेमध्ये ८० धावा केल्या. क्विंटन डिकॉक १५ धावा करत बाद झाला. यानंतर अजिंक्य रहाणे आणि सुनील नरेन यांनी संघाला चांगली सुरूवात करून दिली. सुनील नरेन ३० धावा करत बाद झाला. तर कर्णधार अजिंक्य रहाणेने कर्णधाराला साजेशी खेळी करत ३५ चेंडूत ८ चौकार आणि २ षटकारांसह ६१ धावा केल्या. तर वेंकटेश अय्यरने २९ चेंडूत ६ चौकार आणि एका षटकारासह ४५ धावा केल्या. रमणदीप, अंगक्रिश आणि आंद्रे रसेल एकेरी धावसंख्येवर झेलबाद झाले. तर रिंकू सिंगने ३८ धावा केल्या.दणक्यात सुरूवात केल्यानंतरही अजिंक्य रहाणेने विकेट गमावल्यानंतर संघाने एकामागून एक विकेट गमावल्या. केकेआरच्या फलंदाजांनी लखनौच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. पण गोलंदाजांनी अखेरपर्यंत हार मानली नाही. आकाशदीपने ५५, शार्दुलने ५२, आवेश खानने ४५ तर बिश्नोईने ४७ धावा दिल्या. पण प्रत्येक खेळाडूने विकेट्स घेतल्या आहेत.लखनौने या सामन्यात प्रथम फलंदाजी केली आणि सलग दुसऱ्या सामन्यात त्यांच्या सलामीवीरांनी धमाकेदार सुरुवात केली. एडन मारक्रम आणि मिचेल मार्श यांनी १०.२ षटकांत ९९ धावांची धमाकेदार भागीदारी केली. मार्करम त्याचे सलग दुसरे अर्धशतक पूर्ण करण्यापासून हुकला पण मार्शने या हंगामात त्याचे चौथे अर्धशतक केले. गेल्या सामन्यातील अपयशातून सावरत, निकोलस पूरनने पुन्हा एकदा आपली विध्वंसक खेळी केली आणि फक्त २१ चेंडूत अर्धशतक झळकावले. मार्श ४८ चेंडूत ६ चौकार आणि ५ षटकारांसह ८१ धावांची खेळी केली.यानंतर निकोलस पुरनने आपली वादळी फलंदाजी सुरू ठेवली आणि अखेरपर्यंत नाबाद राहिला. पुरनने ३६ चेंडूत ७ चौकार आणि ८ षटकारांसह ८७ धावांनी नाबाद खेळी केली. यासह लखनौने ३ विकेट्स गमावत २३८ धावा केल्या. लखनौचा संघ या विजयासह गुणतालिकेत चौथ्या स्थानी पोहोचला आहे. अखेरच्या षटकात केकेआरला विजयासाठी २४ धावांची गरज होती. रवी बिश्नोईकडे गोलंदाजीची संधी होती. हर्षित राणाने पहिल्याच चेंडूवर चौकार लगावला. तर दुसरा चेंडू डॉट बॉल गेला. यानंतर तिसऱ्या चेंडूवर हर्षितने एक धाव घेत रिंकूला स्ट्राईक दिली. आता केकेआरला विजयासाठी १९ धावांची गरज होती. रिंकूने पुढच्या दोन चेंडूवर दोन चौकार तर अखेरच्या चेंडूवर षटकार लगावला.

### रिंकू सिंगने 38 धावा केल्या

मात्र संघाला विजय मात्र मिळवून देऊ शकला नाही.लखनौने दिलेल्या २४० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना केकेआरची सुरुवात फारच दणक्यात झाली. केकेआरने पॉवरप्लेमध्ये ८० धावा केल्या. क्विंटन डिकॉक १५ धावा करत बाद झाला. यानंतर अजिंक्य रहाणे आणि सुनील नरेन यांनी संघाला चांगली सुरूवात करून दिली. सुनील नरेन ३० धावा करत बाद झाला. तर कर्णधार अजिंक्य रहाणेने कर्णधाराला साजेशी खेळी करत ३५ चेंडूत ८ चौकार आणि २ षटकारांसह ६१ धावा केल्या. तर वेंकटेश अय्यरने २९ चेंडूत ६ चौकार आणि एका षटकारासह ४५ धावा केल्या. रमणदीप, अंगक्रिश आणि आंद्रे रसेल एकेरी धावसंख्येवर झेलबाद झाले. तर रिंकू सिंगने ३८ धावा केल्या. दणक्यात सुरूवात केल्यानंतरही अजिंक्य रहाणेने विकेट गमावल्यानंतर संघाने एकामागून एक विकेट गमावल्या. केकेआरच्या फलंदाजांनी लखनौच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली.

---

# रोहित शर्माच्या नावाचं स्टँड होणार?

## मुंबई क्रिकेट असोसिएशन घेणार मोठा निर्णय

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघाने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. कर्णधार रोहितच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघाने गेल्या १० महिन्यांत दोन आयसीसी ट्रॉफी आपल्या नावे केल्या. रोहितच्या क्रिकेटमधील अद्वितीय कामगिरी पाहता वानखेडे स्टेडियममधील एका स्टँडला रोहितचं नाव देणार रोहित शर्मा देखील मुंबईचा खेळाडू आहे. याशिवाय त्याने मुंबई संघाकडूनच देशांतर्गत क्रिकेट खेळला आहे.**




दरम्यान मुंबई क्रिकेट असोसिएशनने मोठा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे.मुंबई क्रिकेट असोसिएशन वानखेडे स्टेडियममधील एका स्टँडला रोहित शर्माचं नाव देण्याचा निर्णय घेणार आहे. २०१९ मध्ये, दिल्ली आणि जिल्हा क्रिकेट असोसिएशनने अरुण जेटली स्टेडियममधील एका स्टँडला विराट कोहलीच्या सन्मानार्थ नाव दिले. आता मुंबई क्रिकेट असोसिएशन रोहित शर्माचे नाव स्टँडला देणार असल्याचे समोर येत आहे.वानखेडे स्टेडियमच्या स्टँडला नाव देण्याच्या बाबतीत मुंबईच्या इतर दिग्गजांसह भारतीय कर्णधाराचे नाव यादीत आहे. इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, एमसीएला त्यांच्या क्लब सदस्यांकडून आठ विनंत्या आणि प्रस्ताव मिळाले आहेत. यामध्ये माजी अध्यक्ष शरद पवार आणि विलासराव देशमुख यांच्याशिवाय माजी भारतीय कर्णधार अजित वाडेकर, एकनाथ सोलकर, दिलीप सरदेसाई, पद्माकर शिवलकर, माजी भारतीय महिला कर्णधार डायना एडुलजी आणि रोहित शर्मा यांचा समावेश आहे.एमसीएचे अध्यक्ष अजिंक्य नाईक म्हणाले, "सदस्यांकडून नाव सुचवण्यात आली आहेत आणि अंतिम निर्णय मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या सर्वसाधारण सभेचे सदस्य घेतील." समोर आलेल्या अहवालानुसार, हा निर्णय १५ एप्रिल रोजी होणाऱ्या एमसीएच्या सर्वोच्च परिषदेच्या बैठकीत घेतला जाईल, ज्यामध्ये रोहितच्या नावावर चर्चा केली जाईल. ३७ वर्षीय रोहितने गेल्या १० महिन्यांत भारतासाठी सलग दोन आयसीसी जेतेपदं जिंकली आहेत. तर आयपीएलमध्ये रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखाली मुंबई इंडियन्सच्या संघाने पाच वेळा संघाचे जेतेपद पटकावले आहे. मुंबईतील वानखेडे स्टेडियम हे मुंबई इंडियन्सचं होमग्राऊंड आहे.

### रोहितच्या नावावर चर्चा

रोहितच्या नेतृत्वाखाली भारताने गेल्या वर्षी जून २०२४ मध्ये टी-२० विश्वचषक जिंकला आणि त्यानंतर गेल्या महिन्यात दुबई येथे चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली. मुंबईच्या इतर कोणत्याही खेळाडूला या कामगिरीची बरोबरी करता आलेली नाही. रोहितच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ २०२३ च्या विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचला.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार ।
। दि. 9 एप्रिल 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## पिंपरी चिंचवड महापालिकेला

# महाराष्ट्र आरोग्य सन्मान 2025!

### मुंबई येथे झाला सन्मान, सार्वजनिक आरोग्य सेवेसाठी दोन महत्त्वाची पारितोषिके

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**जागतिक आरोग्य दिनानिमित्त सोमवारी (७ एप्रिल) मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृह येथे झालेल्या “महाराष्ट्र आरोग्य सन्मान २०२५” या राज्यस्तरीय कार्यक्रमात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाचा दोन पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्याचे विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबीटकर यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.**



महानगरपालिकेच्या वतीने आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे, डॉ. राजेंद्र फिरके, डॉ. बाळासाहेब होडगर, डॉ. ऋतुजा लोखंडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत सुपेकर, डॉ. संध्या भोईर, यशस्विता बाणखेले (पी.एच.एन) यांनी हा सन्मान स्वीकारला.

“महाराष्ट्र आरोग्य सन्मान २०२५” या कार्यक्रमात सार्वजनिक आरोग्य विभागातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांचा, महानगरपालिकांचा, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांत उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थांचा व रुग्णालयांचा स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाला दोन पारितोषिके मिळाली आहेत.

‘राज्यातील सर्वाधिक प्रसूती करणारे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र’ या श्रेणीत कै. ह.भ.प. प्रभाकर मल्हारराव कुटे स्मृती रुग्णालय आकुर्डी या रुग्णालयाला पहिल्या क्रमांकाचा पुरस्कार देण्यात आला आहे. तसेच आरोग्य वैद्यकीय अधिकारी या श्रेणीत दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला मिळाला आहे. या पुरस्कारासाठी वर्षभरात रुग्णालयांद्वारे दिल्या जाणाऱ्या सर्व सेवा, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम यांचा सविस्तर विचार करून आणि मूल्यमापन करून आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांची क्रमवारी निश्चित करण्यात आली होती.

या कार्यक्रमात राज्यभरातील जिल्हा रुग्णालये, महानगरपालिका यांसह एकूण ५१ बक्षिसे प्रदान करण्यात आली.

> “ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला राज्यस्तरावर दोन पुरस्कार मिळाले असून हा सन्मान पिंपरी चिंचवड शहरातील सर्व नागरिकांचा आहे. महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून सातत्याने करण्यात येणाऱ्या उत्कृष्ट कामाचा हा सन्मान आहे. आगामी काळातही पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना उत्तमोत्तम आरोग्य सेवा देण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील राहील.
> – **शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## साई मारीगोल्ड हाऊसिंग सोसायटीच्या अध्यक्षपदी प्रदीप खंदारे पाटील यांची निवड

### आगामी अडीच वर्षांसाठी नवीन पदाधिकारी मंडळाची स्थापना

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**साई मारीगोल्ड हाऊसिंग सोसायटी पिंपळे सौदागर पुणे या सोसायटीमध्ये पुढच्या अडीच वर्षासाठी नवीन पदाधिकारी मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये अध्यक्षपदी प्रदीप खंदारे पाटील यांची तर सचिव पदी संदीप गुंजाळ यांची निवड करण्यात आली आहे.**



साई मारीगोल्ड हाऊसिंग सोसायटी मध्ये विकासात्मक उपक्रमासाठी प्रयत्नशील असणार आहे तसेच येणाऱ्या काळामध्ये नवनवीन योजना व उपक्रम उपलब्ध करून देण्याची ग्वाही नवनियुक्त अध्यक्ष प्रदीप खंदारे आणि इतर पदाधिकाऱ्यांनी दिली. तसेच यावेळी पुढील अडीच वर्षांसाठी रेणुका कुलकर्णी यांची खजिनदार पदी निवड करण्यात आली.

या सोसायटीमध्ये जवळपास 168 सदनिकाधारक राहत असून या सर्वांना एकत्र घेऊन पुढे जाण्याचा संकल्प नवीन पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

यावेळी माजी अध्यक्ष अमित रसाळ यांनी व इतर माजी पदाधिकाऱ्यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. माजी सचिव श्रीकांत लोंढे, माजी खजिनदार चेतन मोरे तसेच स्वप्निल महाजन ,तुषार पाटील ,विष्णू पांडे ,विनोद पाटील ,विरेंद्र ताजणे , शब्बार हुसेन ,विजय बगाडे ,हर्षल पाटील ,प्रशांत पोहारे दिनेश ,अमित सोनार, प्रशांत पटील ,प्रशांत कुलकर्णी अमित गुप्ता ,जय नाईक ,सनी राजेश ,दीपक देसाई ,अतुल सिंगल, हर्षल बर्डे यांची उपस्थिती होती .

# Moaraya Shikshan Sanstha
# Computer Vacation Batch
# 2024-25




## Second Batch
From 5th April 2025
Duration One Month
1 Hour /day
Monday to Saturday

For
10th std Students,
12th std students,
parents,
others school students

'C' Language
Fees: 1300/-

Corel Draw
Fees: 1100/-

'C++' Language
Fees: 1300/-

Adobe Photoshop
Fees : 1100/-



Basic Java
Fees : 1300/-

Basic Tally
Fees : 1500

Scratch Animation
Fees : 1300/-

M.S. Office
Fees : 1500/-

Contact: 8087706100/ Computer Lab
Registration started
Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
2025-26
ADMISSIONS
OPEN
PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION
50
FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS
Contact Us Now
86687 55826
98232 31705
Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JR. COLLEGE
WE MAKE YOUR FUTURE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
PROUD PARENTS.
OUR BIGGEST
PRIDE.
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School & Jr. College
95277 64646 / 77967 67292
BRANCHES AT: CHARHOLI | MOSHI | DHANORE

KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)



## BBA
**Bachelor of Business Administration**



## BCA
**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
CREATIVE
7
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com